RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ४१(३)] शुक्रवार, नोव्हेंबर २८, २०२५/अग्रहायण ७, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ६२

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**HOME DEPARTMENT,**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 28th November, 2025.

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA (COMMUNITY SERVICE AS PUNISHMENT FOR CERTAIN OFFENCES) RULES, 2025.

**The Maharashtra (Community Service as Punishment for Certain Offences) Rules, 2025.**

BNSS-0325/C.R.-36/Special-09.—In exercise of the powers conferred by Section 23 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 read with Section 4(f) of the Bharatiya Nyaya Sanhita, 2023, and all other enabling provisions, the Government of Maharashtra hereby makes the following Rules prescribing 'community service' as punishment for certain offences under the Bharatiya Nyaya Sanhita, 2023.

**1. Short Title and Commencement**

1. This Rule may be called The Maharashtra ('Community Services' as Punishment for Certain Offences) Rule, 2025.

2. They shall come into force on the date of their publication in the Official Gazette.

**2. Community Services' as Permissible Punishment**

1. Community services' under section 23 of the Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 shall be awarded as punishment for the following offences under the Bharatiya Nyaya Sanhita, 2023:

a. Public servant unlawfully engaging in trade (Section 202 of BNS).

b. Non-appearance in response to a proclamation under section 84 of Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 (Section 209 of BNS).

c. commit suicide to compel or restrain exercise of lawful power. (Section 226 of BNS).

d. in cases of theft where the value of the stolen property is less than five thousand rupees, and a person is convicted for the first time, shall upon return of the value of property

or restoration of the stolen property (Section 303(2) Proviso of BNS), where it is the sole punishment.

e. Misconduct in public by a drunken person (Section 355 of BNS).

f. Defamation (Section 356(2) of BNS)

**3.** The Court, while awarding 'community services' as a punishment for the above offences, shall also specify—

a. the nature of service;

b. the place of service;

c. the supervising/authorising officer; and

d. the duration of the service,

strictly in accordance with the Schedule-I appended to these Rules.

**4. Duration of Community Service**

The duration of community service shall ordinarily be -

(a) not less than one day and not more than Thirty-One days; or

(b) not less than Forty hours and not more than Two Hundred Forty hours, as the Court may determine depending on the facts of the case;

(c) Community Service shall not exceed period of 8 hours in a day.

**5. Non-Compliance**

Any instance of non-compliance shall be reported in the format given under Schedule-II to the Court by the Monitoring Authority, upon which the Court may take appropriate action as permitted under law.

*SCHEDULE-I*

| Sl. No. | Community Services | Place/Office of service | Authorising officer | Monitoring Authority | Duration of Community Service |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Cleaning/ maintenance of wards and peripherals | Government Hospital/ Government Dispensaries | RMO/Dean or Designated Officer | District Probation Officer or any other appointed or designated officer by the State Government for the purpose | One day to thirty-one days OR forty hours to two hundred forty hours. |
| 2 | Casualty/OP Management | Government Hospital | RMO/Dean or Designated Officer | -do- | -do- |
| 3 | Trolly/Movement assistance | Government Hospital | RMO/Dean or Designated Officer | -do- | -do- |

| Sl. No. | Community Services | Place/Office of service | Authorising officer | Monitoring Authority | Duration of Community Service |
|---|---|---|---|---|---|
| 4 | Any other duties identified by RMO/Dean which requires more special /medical knowledge | Government Hospital | RMO/Dean or Designated Officer | -do- | -do- |
| 5 | Cleaning/ maintenance of study area, stock area, and peripherals | District/Taluka Office /Legal Aid Clinics | Secretary DLSA/ Librarian/ Incharge Officer | -do- | -do- |
| 6 | Arranging of Books/Listing of Books or any clerical assistance or Binding | DLSA Office District/Taluka Office/Any Govt Library | Secretary DLSA/ Librarian/ Incharge Officer | -do- | -do- |
| 7 | Cleaning of classrooms, library, labs, grounds and peripherals. | Govt Educational Institutions | HM/Principal or Designated Officer | -do- | -do- |
| 8 | Cleaning/ maintenance along with Municipal/ Corporation cleaning staff | Corporation/ Municipality/ Panchayat | Respective Commissioner/ BDO or Designated officer | -do- | -do- |
| 9 | Removal of weeds from roadsides | Corporation / Municipality/ Panchayat | Respective Commissioner/ BDO or Designated officer | -do- | -do- |
| 10 | Any Cleaning or maintenance of public buildings. | Public Offices | Concerned Officers | -do- | -do- |
| 11 | Traffic regulation, crowd regulation, premises/station cleaning, common areas maintenance | Police Station | SHO/ Designated Officer | -do- | -do- |
| 12 | Cleaning/ Maintenance | Public Parks/ Space & Beach of Corporation/ Municipality/ Panchayat | Respective Commissioner/ BDO or Designated officer | -do- | -do- |

| Sl. No. | Community Services | Place/Office of service | Authorising officer | Monitoring Authority | Duration of Community Service |
|---|---|---|---|---|---|
| 13 | Cleaning/ Maintenance | Old age homes Mental Health Institutes/ Hostels/ social welfare department buildings | Warden / In charge officer or Designated Officer | -do- | -do- |
| 14 | Tree Planting, watering. weed removal maintenance work and | Forest Department | Ranger / In-charge Officer /Designated Officer | -do- | -do- |
| 15 | Cleaning/ Maintenance or clerical assistance | Zoo/Museums | Curator/In-charge officer/ Designated Officer | -do- | -do- |
| 16 | Any other duty as part of community service which the court deems fit in the given case | Concerned Department | Concerned Officer | -do- | -do- |

## *SCHEDULE-II*

Non-Compliance Report

BEFORE IN THE COURT OF _______

In the Matter of:

State of Maharashtra/______________ [Name of Complainant]

V/S

_____________ [Name of Offender]

Case No.: __________

Order Date: __________

This Non-Compliance Report is respectfully submitted before this Hon'ble Court in the above-mentioned matter. The Court had imposed 'Community Service' as a 'Sentence' under the supervision of this authority. The details of the awarded 'Community Service' sentence are as follows:

Type of Community Service sentence: __________________

Total hours/days required: __________________

Punishment start date: __________________

Punishment completion deadline: __________________

Reporting frequency (hourly/daily/weekly): __________________

It has been found that the offender has failed to comply with the Court's order due to following reasons:

a) Failure to report for community service

b) Absenteeism without valid reason

c) Misconduct at the service location

d) Repeated late reporting

e) Abandonment of assigned tasks

f) Failure to follow instructions/supervisor rules

g) Other (specify): ____________________________

[Provide detailed explanation of events, specific dates, communication attempts with the offender (Telephonic, Written Notice, Email, In-person), warnings issued (Telephonic, Written Notice, Email, In-person), and any response received from the offender. Include any other relevant information supported by office records.]

It is observed that the behaviour, cooperation level, attitude, and overall conduct of the offender are unsatisfactory, and not conducive to maintaining safety, discipline, or the public interest. Accordingly, this Non-Compliance Report is submitted to the Hon'ble Court for its appropriate directions and further necessary action.

Date: -

Place: -

Signature of Supervising Authority/
Head of the Department

**Declaration**

I, [Name, Designation], hereby declare that the information provided in this report is true, accurate, without prejudice, and in accordance with our office records.

Signature of Supervising Authority/
Head of the Department

Name: ___________________

Designation: ___________________

Department / Organization: ___________________

Place: ___________________

Date: ___________________

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. JAYANT SARODE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL /2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ११, अंक ४५]    सोमवार, डिसेंबर १, २०२५/अग्रहायण १०, शके १९४७    [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ६४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**गृह विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र (विवक्षित अपराधांसाठी शिक्षा म्हणून समाजसेवा) नियम, २०२५.**

क्रमांक बीएनएनएस-०३२५/प्र.क्र.३४/विशा-९.— भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २३ तसेच, भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ४ (च) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व तरतुदींचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये विवक्षित अपराधांसाठी शिक्षा म्हणून समाजसेवा विहित करणारे पुढील नियम करीत आहे.

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ**

(१) या नियमांस महाराष्ट्र (विवक्षित अपराधांसाठी शिक्षा म्हणून समाजसेवा) नियम, २०२५ असे म्हणावे.

(२) ते, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. अनुज्ञेय शिक्षा म्हणून समाजसेवा**

(१) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम २३ अन्वये शिक्षा म्हणून समाजसेवा ही, भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये पुढील अपराधांसाठी दिली जाईलः—

(क) लोकसेवकाने बेकायदेशीरपणे व्यापारधंदा करणे (भारतीय न्याय संहितेचे कलम २०२).

(ख) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम ८४ अन्वये केलेल्या उद्घोषणेत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत उपस्थित न होणे (भारतीय न्याय संहितेचे कलम २०९).

(ग) कायदेशीर अधिकारांचा वापर करण्यास भाग पाडण्यासाठी किंवा त्यापासून परावृत्त राहण्यासाठी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणे (भारतीय न्याय संहितेचे कलम २२६).

(घ) चोरीच्या प्रकरणांमध्ये, जर चोरीच्या मालमत्तेचे मूल्य पाच हजार रुपयांपेक्षा कमी असेल आणि एखाद्या व्यक्तीस प्रथमच दोषी ठरविले असेल, अशा प्रकरणी [भारतीय न्याय संहितेचे कलम ३०३(२) चे परंतुक] मालमत्तेचे मूल्य परत केल्यावर किंवा चोरीची मालमत्ता पुनर्संचयित केल्यावर, जर ही एकमात्र शिक्षा असेल.

(ङ) मद्यपान केलेल्या व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी केलेले गैरवर्तन (भारतीय न्याय संहितेचे कलम ३५५).

(च) अब्रूनुकसानी [भारतीय न्याय संहितेचे कलम ३५६(२)].

**३. न्यायालय**

वरील गुन्ह्यांसाठी शिक्षा म्हणून 'समाजसेवा' देत असताना, पुढील बाबी या नियमांना जोडलेल्या अनुसूची- एक नुसार काटेकोरपणे असल्याचे देखील विनिर्दिष्ट करील—

(क)सेवेचे स्वरूप;

(ख) सेवेचे ठिकाण;

(ग) देखरेख/प्राधिकृत करणारा अधिकारी; आणि

(घ) सेवेचा कालावधी

**४. समाजसेवेचा कालावधी**

सर्वसाधारणपणे समाज सेवेचा कालावधी पुढीलप्रमाणे असेलः—

(क) एका दिवसापेक्षा कमी नसेल आणि एकतीस दिवसांपेक्षा अधिक असणार नाही; किंवा

(ख) न्यायालय, प्रकरणाच्या तथ्यांवर आधारित निर्धारित करील त्यानुसार चाळीस तासांपेक्षा कमी नसेल आणि दोनशे चाळीस तासांपेक्षा अधिक असणार नाही;

(ग) समाजसेवा एका दिवसामध्ये ८ तासांच्या कालावधीपेक्षा अधिक असणार नाही.

**५. अनुपालन न करणे**

अनुपालन न झालेल्या कोणत्याही बाबीचा, संनियत्रण प्राधिकाऱ्याद्वारे अनुसूची-दोनमध्ये दिलेल्या नमुन्यात न्यायालयास अहवाल सादर करण्यात येईल, ज्यावर न्यायालय कायद्याने अनुज्ञेय असेल ती कार्यवाही करू शकेल.

# अनुसूची-एक

| अ. क्र. | सामुदायिक सेवा | सेवेचे ठिकाण/कार्यालय | प्राधिकृत अधिकारी | संनियत्रण प्राधिकारी | सामुदायिक सेवेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग व परिसर यांची स्वच्छता/ देखभाल | शासकीय रुग्णालय/ शासकीय दवाखाने | निवासी वैद्यकीय अधिकारी/ अधिष्ठाता किंवा पदनिर्देशित अधिकारी | जिल्हा परिवीक्षा अधिकारी किंवा राज्य शासनाने या प्रयोजनार्थ नियुक्त/ पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | एक दिवस ते एकतीस दिवस किंवा चाळीस तास ते दोनशे चाळीस तास. |
| २ | अपघात/बाह्यरुग्ण व्यवस्थापन | शासकीय रुग्णालय | निवासी वैद्यकीय अधिकारी/ अधिष्ठाता किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| ३ | ट्रॉली/हालचाल सहाय्य | शासकीय रुग्णालय | निवासी वैद्यकीय अधिकारी/ अधिष्ठाता किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| ४ | अधिक विशेष/ वैद्यकीय ज्ञान आवश्यक आहे अशी निवासी वैद्यकीय अधिकारी/ अधिष्ठाता यांनी सुनिश्चित केलेली इतर कोणतीही कर्तव्ये | शासकीय रुग्णालय | निवासी वैद्यकीय अधिकारी/ अधिष्ठाता किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| ५ | अभ्यास क्षेत्र, भांडार क्षेत्र आणि परिसर यांची स्वच्छता/देखभाल | जिल्हा/तालुका कार्यालय/कायदेशीर मदत केंद्रे | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण/ ग्रंथपाल/प्रभारी अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| ६ | पुस्तके लावणे/ पुस्तकांची सूची बनवणे किंवा कोणतेही लिपिकीय सहाय्य किंवा बांधणी | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जिल्हा कार्यालय/तालुका कार्यालय/कोणतेही शासकीय ग्रंथालय | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण / ग्रंथपाल/प्रभारी अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |

| अ. क्र. | सामुदायिक सेवा | सेवेचे ठिकाण/कार्यालय | प्राधिकृत अधिकारी | संनियत्रण प्राधिकारी | सामुदायिक सेवेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ७ | वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रयोगशाळा, मैदाने आणि परिसर यांची स्वच्छता. | शासकीय शैक्षणिक संस्था | मुख्याध्यापक/ प्राचार्य किंवा पदनिर्देशित अधिकारी | जिल्हा परिवीक्षा अधिकारी किंवा राज्य शासनाने या प्रयोजनार्थ नियुक्त/ पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | एक दिवस ते एकतीस दिवस किंवा चाळीस तास ते दोनशे चाळीस तास. |
| ८ | महानगरपालिका/ नगरपालिका स्वच्छता कर्मचाऱ्यांसह स्वच्छता/देखभाल | महानगरपालिका/ नगरपालिका/पंचायत | संबंधित आयुक्त/ गट विकास अधिकारी किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| ९ | रस्त्याच्या कडेची तण काढणे | महानगरपालिका/ नगरपालिका/पंचायत | संबंधित आयुक्त/ गट विकास अधिकारी किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| १० | सार्वजनिक इमारतींची कोणतीही स्वच्छता किंवा देखभाल. | सार्वजनिक कार्यालये | संबंधित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| ११ | वाहतूक नियमन, गर्दी नियमन, परिसर/स्थानकाची स्वच्छता, सामायिक क्षेत्रांची देखभाल | पोलीस ठाणे | ठाणे प्रभारी अधिकारी/ पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| १२ | स्वच्छता/देखभाल | महानगरपालिका/ नगरपालिका/पंचायत यांची सार्वजनिक उद्याने/ जागा आणि चौपाट्या | संबंधित आयुक्त/ गट विकास अधिकारी किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| १३ | स्वच्छता/देखभाल | वृद्धाश्रम, मनोरूग्ण संस्था/वसतिगृहे/समाज कल्याण विभाग इमारती | अधीक्षक/प्रभारी अधिकारी किंवा पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |
| १४ | वृक्षारोपण, पाणी देणे. तण काढणे, देखभाल कार्य | वन विभाग | वनपाल प्रभारी अधिकारी/ पदनिर्देशित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |

| अ. क्र. | सामुदायिक सेवा | सेवेचे ठिकाण/कार्यालय | प्राधिकृत अधिकारी | संनियत्रण प्राधिकारी | सामुदायिक सेवेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १५ | स्वच्छता/देखभाल किंवा लिपिकीय सहाय्य | प्राणी संग्रहालय/ संग्रहालये | अभिरक्षक/ प्रभारी अधिकारी/ पदनिर्देशित अधिकारी | जिल्हा परिवीक्षा अधिकारी किंवा राज्य शासनाने या प्रयोजनार्थ नियुक्त/ पदनिर्देशित केलेला अन्य कोणताही अधिकारी | एक दिवस ते एकतीस दिवस किंवा चाळीस तास ते दोनशे चाळीस तास. |
| १६ | दिलेल्या बाबीकरीता सामुदायिक सेवेचा भाग म्हणून न्यायालयास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही कर्तव्य | संबंधित विभाग | संबंधित अधिकारी | -वरीलप्रमाणे- | -वरीलप्रमाणे - |

## अनुसूची-दोन

अनुपालन न केल्याचा अहवाल

न्यायालयात __________________ यांच्या समक्ष

प्रकरणातः

महाराष्ट्र राज्य/______________ [तक्रारदाराचे नाव]

विरुद्ध

_____________ [अपराध्याचे नाव]

प्रकरण क्रमांकः __________

आदेश दिनांकः __________

वर नमूद केलेल्या प्रकरणी या माननीय न्यायालयासमोर अनुपालन न करण्याबाबतचा अहवाल आदरपूर्वक सादर केला आहे. न्यायालयाने या प्राधिकरणाच्या देखरेखीखाली शिक्षा म्हणून समाजसेवा लादली होती. समाजसेवेंच्या शिक्षेचा तपशील खालीलप्रमाणे आहेः

समाज सेवेच्या शिक्षेचा प्रकारः __________________

आवश्यक एकूण तास/दिवसः __________________

शिक्षेच्या प्रारंभाची तारीखः __________________

शिक्षा पूर्ण करण्याचा अंतिम दिनांकः __________________

अहवाल सादर करण्याची वारंवारता (तास/दैनंदिन/साप्ताहिक): __________________

अपराध्याने न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन न करण्याची पुढील कारणे आढळून आलेली आहेतः

(क) समाजसेवेसाठी हजर होण्यास कसूर करणे

(ख) वैध कारणाशिवाय अनुपस्थित राहणे

(ग) सेवेच्या ठिकाणी गैरवर्तन करणे

(घ) वारंवार उशिरा उपस्थित होणे

(ङ) सोपवलेले काम सोडून देणे

(च) सूचनांचे/पर्यवेक्षक नियमांचे अनुसरण करण्यात कसूर करणे

(छ) इतर (नमूद करा): ______________________________

[घटनांचे सविस्तर स्पष्टीकरण, विशिष्ट दिनांक, अपराध्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न (दूरध्वनी, लेखी सूचना, ईमेल, समक्ष), त्याला दिलेले इशारे (दूरध्वनी, लेखी सूचना, ईमेल, समक्ष) आणि अपराध्याकडून मिळालेला कोणताही प्रतिसाद येथे द्यावा. कार्यालयीन अभिलेखांसह इतर कोणतीही संबंधित माहिती समाविष्ट करा.]

अपराध्याचे वर्तन, सहकार्याची पातळी, दृष्टिकोन आणि एकूण वर्तणूक असमाधानकारक असून ते सुरक्षा, शिस्त किंवा सार्वजनिक हित यादृष्टीने हितावह नाही, असे दिसून आले आहे. त्यानुसार, माननीय न्यायालयासमोर यथोचित निर्देश आणि पुढील आवश्यक कारवाईसाठी हा अनुपालन न करणे याबाबतचा अहवाल सादर करण्यात येत आहे.

दिनांक : —

ठिकाण : —

पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्याची/ विभागप्रमुखाची स्वाक्षरी

**घोषणापत्र**

मी, [नाव, पदनाम], याद्वारे घोषित करतो/करते की, या अहवालात दिलेली माहिती खरी, अचूक, पूर्वग्रहविरहित असून आणि आमच्या कार्यालयीन नोंदीनुसार आहे.

पर्यवेक्षकीय प्राधिकाऱ्याची/ विभागप्रमुखाची स्वाक्षरी

नावः ____________________

पदनामः ____________________

विभाग / संस्थाः ____________________

ठिकाणः ____________________

दिनांकः ____________________

________________________________

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. जयंत सरोदे,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.